# Washim District Police

**Nature of Work** :- **Solving sensational crimes**

**Police Station** :- **Jaulka**

**Date of Good Work done** :- **21/02/2023**

**Brief of the work done :-**

हत्या प्रकरणातील पाचव्या आरोपीस अटक ; आरोपींना 5 दिवसांची पोलीस कोठडी.

# खून प्रकरणातील पाचवा आरोपी गजाआड

## गुरुवारपर्यंत पोलीस कोठडी; बोराळा उपसरपंचाची हत्या

**किन्हीराजा,** दि. २० (प्रतिनिधी)

राजकीय वैमनस्यातून मालेगाव तालुक्यातील बोराळा येथील उपसरंपचाचे किन्हीराजा येथून १८ फेब्रुवारीला अपहरण करुन खुन करण्यात आला. याप्रकरणी पोलिसांनी तत्परतेने चार जणांना अटक केली. यानंतर त्यांचा सहकारी पाचवा आरोपीला बेड्या ठोकल्या असून एका विधिसंघर्षग्रस्त युवकास ताब्यात घेतले आहे. अटकेतील आरोपींना न्यायालयात हजर केले असता पाचही जणांना २३ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

अधिक माहितीनुसार, बोराळा येथील उपसरपंच विश्वास कांबळे यांचे अपहरण करुन भरदिवसा खुन करण्यात आला. या घटनेनंतर पोलिसांनी केशव वानखेडे, रामचंद्र वानखेडे, शामसुंदर वानखेडे व नामदेव वानखेडे चार भावंडांना तत्काळ अटक केली. यानंतर त्यांचा पाचवा सहकारी वाशीम तालुक्यातील जांभरुण महाली येथील गुणवंत लक्ष्मण महल्ले नामक आरोपीला बेड्या ठोकण्यात जऊळका पोलिसांना यश आले. दरम्यान, चौकशीतून मिळालेल्या माहितीवरुन एका विधीसंघर्षग्रस्त युवकासही ताब्यात घेतले आहे. त्यामुळे याप्रकरणात आरोपींची संख्या पाचवर पोहचली आहे. घटनेचा पुढील तपास मंगरुळपीर उपविभागीय पोलीस अधिकारी यशवंत केडगे हे करीत आहेत.